RNI No. MAHBIL/2009/35527

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-क

वर्ष ७, अंक ४८] गुरुवार, डिसेंबर २३, २०२१/पौष २, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ५६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाव्यतिरिक्त इतर वैधानिक प्राधिकाऱ्यांनी तयार केलेले (भाग एक, एक-अ व एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले वैधानिक नियम व आदेश यांव्यतिरिक्त इतर) वैधानिक नियम व आदेश ; यात भारत सरकार, उच्च न्यायालय, पोलीस आयुक्त, आयुक्त (राज्य उत्पादन शुल्क), जिल्हादंडाधिकारी व निवडणूक आयोग, निवडणूक न्यायाधिकरण, निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणूक आयोगाखालील इतर प्राधिकारी यांनी तयार केलेले वैधानिक नियम व आदेश यांचा समावेश होतो.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन मुंबई, दिनांक २३ डिसेंबर, २०२१

**अधिसूचना**

क्रमांक १/ङ-९/२०२१.—महाराष्ट्र विधानसभा नियमातील पुढील सुधारणा उक्त नियमातील नियम २२५ च्या पोट-नियम (३) ला अनुसरुन, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत :—

**महाराष्ट्र विधानसभा नियमात सुधारणा**

**नियम ६**

१. महाराष्ट्र विधानसभा नियम (यात यापुढे "उक्त नियम") यामधील नियम ६ मध्ये.—

(१) पोट-नियम (१) मध्ये "निवडणूक घेण्यासाठी" हा मजकूर वगळून "मुख्यमंत्री यांच्या शिफारशीवरुन अध्यक्षाची निवड करण्यासाठी" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

(२) पोट-नियम (२) मध्ये "अशारितीने ठरविलेल्या तारखेच्या अगोदरच्या दिवसाच्या मध्यान्हाच्या पूर्वी कोणत्याही वेळी कोणत्याही सदस्यास," या मजकुरानंतर "निवडणुकीसाठी" या मजकुराऐवजी "अध्यक्षांची निवड करण्यासाठी" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

(३) पोट-नियम (२) च्या खंड (ब) नंतर पुढील परंतुक दाखल करण्यात यावे :—

"परंतु, सदस्याला स्वत:चे नाव सुचविता येणार नाही अथवा त्याचे नाव सुचविण्यात आलेल्या प्रस्तावाला अनुमोदन देता येणार नाही अथवा एकाहून अधिक प्रस्ताव मांडता येणार नाहीत किंवा त्यांना अनुमोदन देता येणार नाही."

(४) नियम ६ च्या पोट-नियम (३) ऐवजी पुढील पोट-नियम दाखल करण्यात येईल :—

(३) (अ) कामकाज पत्रिकेत प्रस्ताव ज्याच्या नावावर असेल अशा सदस्याचे नाव पुकारण्यात आल्यानंतर, त्याला प्रस्ताव मांडता येईल अथवा मागे घेता येईल. आणि त्यावेळी त्याचे निवेदन तेवढया पुरतेच मर्यादित राहील,

(ब) जे प्रस्ताव मांडले गेले असतील व ज्यांना रीतसर अनुमोदन देण्यात आले असेल, असे प्रस्ताव ज्या क्रमाने मांडण्यात आले असतील त्याप्रमाणे ते एकामागून एक सभागृहापुढे ठेवण्यात येतील व आवश्यक वाटल्यास मत विभाजनाद्वारे त्यावर निर्णय घेतला जाईल. प्रस्तावाच्या मत विभाजनाच्या वेळी सम-समान मते पडल्यास उपाध्यक्ष, विधानसभेने ठरविलेली व्यक्ती किंवा संविधानाच्या अनुच्छेद १८० च्या खंड (१) अन्वये नेमलेल्या व्यक्तीस, निर्णायक मत (Casting Vote) देण्याचा अधिकार असेल.

(क) कोणताही प्रस्ताव संमत करण्यात आल्यास अध्यक्ष पदावर असलेली व्यक्ती, नंतरचे प्रस्ताव पुढे न ठेवता, ज्या प्रस्तावाला संमती देण्यात आली असेल त्यात प्रस्तावित केलेला सदस्य अध्यक्ष म्हणून निवडून आल्याचे जाहीर करील."

(५) नियम ६ चे पोट-नियम (५), (६) व (७) वगळण्यात यावे.

२. उक्त नियमांच्या नियम ७ मध्ये—

(१) "निवडणूक घेणे" या मजकूराऐवजी "निवड करणे" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

(२) "निवडणूक घेण्यासाठी" या मजकूराऐवजी "निवड करण्यासाठी" हा मजकूर दाखल करण्यात यावा.

(३) "निवडणुकीस" या शब्दाऐवजी "निवडीस" हा शब्द दाखल करण्यात यावा.

राजेन्द्र भागवत,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.